कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/गोमुदि/२०२३–२४/३००१
दि.२०/१२/२०२३

### कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी गोवा इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा या उभयसंस्थातर्फे गोवा मुक्ती दिनाचे औचित्य साधून कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागाच्या व्याख्यात्यांचा सहभाग असलेला शास्त्रीय गायन व वादनाचा कार्यक्रम इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कला अकादमीचे कार्यक्रम व विकास अधिकारी श्री. प्रदीप गांवकर यांनी प्रास्ताविक करुन उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरवात श्रीमती सम्राज्ञी आईर हिच्या शास्त्रीय गायनाने झाली. सम्राज्ञी हिने राग मधुवंती आळवून भजन सादर केले. त्यांना श्री. दयानिधेश कोसंबे व श्री. शुभम नाईक यांनी अनुक्रमे तबला व हार्मोनियमची साथसंगत केली.

श्रीमती सम्राज्ञी हिच्या शास्त्रीय गायनाला जोडून श्री. सुभाष फातर्पेकर यांनी हार्मोनियम सोलो वादन सादर केले. त्यांनी राग पूरिया कल्याण सादर करुन रसिक श्रोत्याना मंत्रमुग्ध केले. त्यांना श्री. गीतेश मांद्रेकर यांची तबला साथ लाभली. त्यानंतर श्री. प्रेमानंद आमोणकर यांनी सालो तबला वादन सादर करुन तीन तालात पेशकार, कायदे, रेळे, गती व चक्रधार तुकडे सादर करुन मैफलीत रंग भरला. त्यांना श्री. चारुदत्त गावस यांनी संवादिनीची साथ केली.

या कार्यक्रमाची सांगता श्री. सचिन तेली यांनी सादर केलेल्या राग पूरिया धनश्रीने झाली. याप्रसंगी त्यांनी “गोंयचें नांव व्हड करुंन ल्हान जाले महान, बंदखणीचीं देवळां जालीं लामण दिवे प्राण” ही बाकीबाबांची रंचना प्रभावीपणे सादर करुन रसिकांची मने जिकली. श्री. सचिन तेली यांच्या या गायनासाठी श्री. चारुदत्त गावस व श्री. सुरज मोरजकर यांनी अनुक्रमे हार्मोनियम व तबला साथ केली तर मुक्ता मिसर व सत्यनारायण कळंगुटकर यांनी तानपुरा साथ केली.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

**सोबतः- फोटो**

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)